निशाणी क्र. ७२ खाली.

**<u>प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. बी.एन.लोमटे यांचे मार्फत उलट तपासणी शपथेवर पुन्हा सुरु–</u>**

४. गट क्र १७५ मध्ये व्यंकट गणपत शितोळे, अभिजीत बंकट शितोळे, उषाबाई बालाजी शितोळे यांची शेती आहे. सदर व्यक्तींच्या जमीनी माझ्या जमीनीच्या पश्चिम दिशेस आहेत. माझ्या शेताच्या पश्चिम बाजुला व्यंकट गणपत शितोळे यांची शेती आहे. व्यंकट शितोळे यांच्या पश्चिम बाजूला अभिजीत शितोळे यांची शेती आहे. अभिजीत शितोळे यांच्या दक्षिणेस उषाबाई शितोळे यांची शेती आहे. हे म्हणने खरे आहे की, माझ्या शेताच्या दक्षिणेस गट नं १७६ व गट नं. १७६ च्या दक्षिणेस गट क्र. १८० आहे. हे म्हणने खरे आहे की, माझ्या गट क्र. १७५ च्या उत्तरेस गट क्र. १७० आहे. गट क्र. १७० मध्ये माझी स्वतःची, उषाबाई शितोळे, जगन्नाथ भानुदास शितोळे यांच्या शेतजमीनी आहेत. गट क्र. १७६ मध्ये रंगनाथ रामभाउ शितोळे यांची शेती होती. आता सदर गट क्र १७६ मध्ये बालासाहेब मोहन शितोळे व साहेबराव मोहन शितोळे यांच्या शेतजमीनी आहेत. माझ्या गट नं. १७५ च्या दक्षिण बाजुला लागुनच बाळासाहेब शितोळे यांची वाटणी आहे. रंगनाथ शितोळे यांची शेतजमीन बाळासाहेब शितोळेच्या वाटणीच्या पश्चिम बाजुला आहे. हे म्हणने खरे आहे की, सध्यस्थितीत साहेबराव शितोळे यांच्या शेतजमीनीशी माझा कोणताही संबंध येत नाही. गट क्र १८० मध्ये बालासाहेब शितोळे यांची शेतजमीन आहे. हे म्हणने खरे आहे की, गट क्र. १८० व गट क्र १७५ या जमीनी एकमेकांस लागून नाहीत. हे म्हणने खरे आहे की, वादपत्रासोबत जो नकाशा जोडलेला आहे त्यामध्ये दिलेले वर्णन हे बरोबर आहे. गट क्र. १७५ मधील २६ आर व २७ आर क्षेत्र हे मी वेगवेगळ्या खरेदीखतान्वये विकत घेतलेले आहे. सदर खरेदीखते होतेवेळी सदरहू क्षेत्र मी मोजणी करुन खरेदीखत लिहून देणार यांचेकडून घेतले नव्हते. हे म्हणने खरे आहे की, ज्या प्रमाणे मुळ मालक सदरहू ताब्यात ठेउन होता त्याच प्रमाणे ते क्षेत्र मी सदर खरेदीखतान्वये ताब्यात घेतले होते. वादमिळकतीच्या दक्षिण बाजुने बांधावरुन असणारा रस्ता हा गाडीबैलाचा पाच ते सहा फुटाचा रस्ता होता. त्या रस्त्याची ७/१२ उताऱ्यावर नोंद आलेली नाही. हे म्हणने खरे आहे की, आजरोजी सदरहू रस्ता अस्तित्वात नाही.

५. हे म्हणने खरे आहे की, वादशेताच्या पुर्व बाजुला नायगाव–माटेफळ गावाची शिव आहे. हे म्हणने खरे नाही की, सदर नायगाव–माटेफळ गावची शिव आहे त्या शिव रस्त्यावरुन लगतचे कास्तकार त्यांच्या शेतजमीनी वहित करीत असतात.

६. वादातीत जमीनीची मोजणी ही नेमक्या कोणत्या तारखेस मी करुन घेतली होती ती तारीख मला आठवत नाही. सदर मोजणीस मी, प्रतिवादी साहेबराव, व्यंकट शितोळे इत्यादी

हजर होते. हे म्हणने खरे आहे की, सदर मोजणीचे वेळी संबंधीत मोजणी अधिकाऱ्याने गट क्र १७५ ची मोजणी केली होती. सदर गट क्र. १७५ चा जुना सर्व्हे क्रमांक काय आहे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, सदर जुना सर्व्हे क्रमांक त्या मोजणीच्या वेळी मोजणीखाली घेण्यात आलेला नव्हता. हे म्हणने खरे आहे की, गट क्र १७६ व १७० या दोन्ही शेतजमीनीची मोजणी ज्यावेळी माझे गट क्र. १७५ ची मोजणी करण्यात आली त्यावेळी करण्यात आली नव्हती. गट क्र १७५ मधील इतर सहधारकांच्या जमीनीची मोजणी करून त्यांच्या हद्दीखुणा निश्चित करण्यात आलेल्या नव्हत्या.

७. तहसीलदार कार्यालय कळंब यांच्याकडे मी जो तक्रारी अर्ज दिला होता त्यामध्ये काय कारवाई करण्यात आली होती ते मला सांगता येईल. सदर प्रकरणामध्ये संबंधीत अधिकारी यांनी प्रतिवादींनी फोडलेला बांध हा पुर्ववत करून घेण्याचा आदेश पारीत केला होता. प्रतिवादीने सदर आदेशाचे पालन न केल्यामुळे सदर बांध हा तहसील कार्यालयाच्या यंत्रणेद्वारे पुर्ववत करण्याची कारवाई करण्यात आलेली नाही.

८. हे म्हणने खरे नाही की, मी ज्यावेळी वादातीत मिळकत ही खरेदी केलेली होती व त्यावेळी जी परिस्थिती होती तीच परिस्थिती मोजणीच्या वेळी होती.

९. हे म्हणने खरे आहे की, रायगव्हाण शिवारात एक तळे आहे. हे म्हणने खरे आहे की, त्या तळ्यापासुन प्रतिवादी क्र. ३ याने त्यांचे गट क्र. १८० व १९१ मध्ये पाईपलाईनच्या माध्यमातून पाणी आणलेले आहे. हे म्हणने खरे नहाी की, मी शपथपत्रात नमुद केल्याप्रमाणे आंबेजोगाई मुरुड रस्ता हा माझ्या शेतात जाण्या येण्याकरीता अस्तीत्वात होता असे मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणने खरे नाही की, मी वादातीत जमीन विकत घेण्याआगोदर माझ्या शेतजमीनीचे पुर्वीचे मालक हे सदर शेतजमीनीच्या पुर्व बाजुने जी माटेफळ–नायगावची शिव होती त्याच शिवेवरील रस्त्याचा वापर सदर शेतात जाण्या–येण्याकरीता करती होते. हे म्हणने खरे नाही की, मी सदरहू मिळकत विकत घेतल्यानंतर त्याच रस्त्याचा वापर जाण्या–येण्या करीता करीत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या शपथपत्रान नमुद केल्याप्रमाणे गट क्र १७५ व १८० मधुन पावसाचे पाणी हे माझ्या शेतजमीनीत येउन माझ्या शेतातील पिकांचे नुकसान करत असते हे मी खोटे कथन केलेले आहे. हे म्हणने खरे नाही की, प्रतिवादींनी माझ्या मालकीच्या कोणत्याही क्षेत्रावर अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणने खरे नाही की, माझ्या जमीनीची झालेली कथीत मोजणी ही चुकीची झालेली आहे. हे म्हणने खरे नाही की, प्रतिवादींविरुध्द तहसील कार्यालयात केलेली कारवाई ही संबंधीत तहसील कार्यालयाचे अधिकाऱ्यांशी संगणमत करून करण्यात आलेली आहे. हे म्हणने खरे नाही की, अभिलेखावर दाखल पंचनामे हे संबंधीत अधिकाऱ्यांनी मोक्यास्थळी न जाता कार्यालयातच बसुन केलेले

आहेत. हे म्हणने खरे नाही की, मी खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणने खरे नाही की, प्रतिवादीच्या ताब्यात माझ्या मालकीचे कोणतेही क्षेत्र नाही. हे म्हणने खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

RAVINDRA PRALHAD BATHE

Digitally signed by RAVINDRA PRALHAD BATHE
Date: 2023.01.12 18:27:53 +0530

दिनांक :– १२/०१/२०२३.

**(आर.पी.बाठे)**

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कळंब.